20 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# कॅशलेस जनजागृतीसाठी प्रयत्न

## प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांचे प्रतिपादन : डिजिटल अवेअरनेस प्रोग्राम'चे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यासंदर्भात सर्वसामान्य नागरिकांत जनजागृती करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी प्रयत्नशील राहणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ व ॲक्सिस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिक्षेत्रात 'डिजिटल अवेअरनेस प्रोग्राम' राबविण्यात येणार आहे. या 'डिजी-मेळा' उपक्रमाचा प्रारंभ डॉ. मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ॲक्सिस बँकेच्या पुणे सर्कलच्या उपाध्यक्षा रमा मुमाडी व कोल्हापूर क्लस्टर हेड नवेंदू कुमार उपस्थित होते.

प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे म्हणाले, केंद्र सरकारने कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. एक चळवळ म्हणून या गोष्टीकडे सर्वांनी पाहण्याची गरज आहे. जोपर्यंत समाजातला प्रत्येक घटक त्यामध्ये सहभागी होणार नाही, तोपर्यंत यात यश येणार नाही. नेमकी ही बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने या डिजीटल बँकिंग व्यवहारांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यासाठी एक डिजीटल रथही (डिजी-व्हॅन) तयार केला असून त्याद्वारे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांना ऑनलाइन बँकिंग व्यवहारांबरोबरच मोबाईलद्वारे कॅशलेस बँकिंग व्यवहार कसे करावेत, याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

### एनएसएसच्या विद्यार्थ्यांचे कॅशलेस व्यवहारांबाबत पथनाट्य

*'डिजिटल अवेअरनेस प्रोग्राम'च्या उद्घाटनप्रसंगी कॅशलेस व्यवहारांबाबत* जागृतीसाठी तयार केलेल्या विशेष 'डिजी-व्हॅन'लाही ध्वज दाखवून उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. ही डिजी-व्हॅन पुढील १५ दिवस कोल्हापूर शहर परिसरातील विविध महाविद्यालयांत जाऊन कॅशलेस व्यवहारांबाबत जागृती करणार आहे. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी कॅशलेस व्यवहारांबाबत जागृतीपर पथनाट्य सादर केले.

ॲक्सिस बँकेच्या पुणे सर्कलच्या उपाध्यक्षा रमा मुमाडी म्हणाल्या, केंद्र सरकारच्या उपक्रमाला सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने हाती घेतलेल्या उपक्रमात सहभाग नोंदविताना ॲक्सिस बँक परिवाराला आनंद होत आहे. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथनाट्य सादरीकरण करणाऱ्या पथकाला सोबत घेऊन जनजागृती करण्याचा मानस आहे.

ॲक्सिस बँकेचे कोल्हापूर शाखेचे सह-उपाध्यक्ष घनश्याम चांडक यांनी कॅशलेस व्यवहार कसे करावेत याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, प्रशासकीय सेवक तसेच ॲक्सिस बँकेचे पदाधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'संशोधनात मोडीचे महत्त्व अमूल्य'

**कोल्हापूर** : 'इतिहास संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी माजी विद्यार्थी मागोवा शिबिर आयोजित केले, त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. पवार म्हणाले, 'इतिहास संशोधकांना मोडी कागदपत्रे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या माध्यमातून संशोधनामध्ये मौलिक भर पडू शकते. मोडी अभ्यासकांना त्या त्या काळाच्या सामजिक स्थितीचे भान असणे आवश्यक आहे. शिवकालीन कागदपत्रांचे संशोधन करत असताना डॉ. बापूजी साळुंखे, डॉ. आप्पासाहेब पवार, वा. सी. बेंद्र अशा ज्येष्ठ संशोधकांचा सहभाग लाभला, यामुळेच इतिहास क्षेत्रामध्ये योगदान देता आले.'

प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे म्हणाले, 'इतिहास विजयाच्या बाजूने लिहिला जातो. यामुळे त्याच्या पुनर्लेखनाची गरज निर्माण झालेली आहे. यासाठी मोडी दस्तऐवजांची गरज लागते.'

यावेळी विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा यांच्यासह राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह राजेयादव, वसंत सिंघण यांनी मनोगत व्यक्त केले. विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले. आदित्य मैंदर्गीकर यांनी आभार मानले. यावेळी आर. एस. कुलकर्णी, अशोक सडोलीकर, पीर महमद नवाब, सुनील मोहिते, मनवीर केसरकर, वीरेंद्र सोलापुरे यांच्यासह अनेक मोडीसाधक उपस्थित होते.

2 0 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# रोकडरहित व्यवहारांमुळे भ्रष्टाचाराला पायबंद

## – संजय मणियार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

रोकडरहित व्यवहारांमुळें भ्रष्टाचार, बनावट नोटा व दहशतवादी कारवायांना पायबंद बसेल. यासाठी वित्तीय साक्षरतेच्या माध्यमातून रोकडरहित बँक व्यवहाराची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे झोनल मॅनेजर संजय मणियार यांनी केले.

ते शिवाजी विद्यापीठ, अनुलोम व राष्ट्रीय सेवा योजना महावीर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय साक्षरता अभियान व रोकडरहित महाराष्ट्र या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आर. पी. लोखंडे व प्रमुख उपस्थिती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गांयकवाड उपस्थित होते.



**कोल्हापूर : वित्तीय साक्षरता अभियान व रोकडरहित महाराष्ट्र या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना संजय मणियार. यावेळी सोबत प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे, डॉ. डी. के. गायकवाड, प्रा. गोपाळ गावडे व इतर.**

मणियार म्हणाले, रोकडरहित महाराष्ट्र ही काळाची गरज आहे. रोकडरहित बँक व्यवहार करणे साधे व सोपे आहे. यासाठी घरातील एका तरी व्यक्तीचे बँकेत खाते असावे. एटीएम किंवा भीम ॲपचा वापर करून कॅशलेस व्यवहार करावा.

डॉ. डी. के. गायकवाड म्हणाले, नोटाबंदीमुळे ग्रामीण भागातील बँक व्यवहारामधील अडचणी दूर करण्वासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेने महाराष्ट्र सरकारचे वित्तीय साक्षरता अभियान व रोकडरहित महाराष्ट्र ही योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे ठरविले आहे.

डॉ. आर. पी. लोखंडे म्हणाले, रोकडरहित महाराष्ट्र ही आजची खरी वास्तवता असून तरुण पिढीने मन लावून काम केल्यास हे अभियान यशस्वी होईल.

ही कार्यशाळा तीन सत्रांमध्ये झाली. प्रथम सत्रामध्ये प्रा. श्रीकांत बच्चे यांचे 'वित्तीय साक्षरता काळाची गरज', द्वितीय सत्रामध्ये नीरजकुमार मिश्रा यांचे 'रोकडरहित व्यवहार', तृतीय सत्रामध्ये प्रा. रेणुका चव्हाण यांचे 'ऑनलाईन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी' व चौथ्या सत्रामध्ये विवेक मोरबाळे यांचे मार्गदर्शन झाले आहे.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. गोपाळ गावडे यांनी केले. आभार प्रा. अंकुश गोंगडे यांनी मानले, सूत्रसंचालन स्नेहल पाटील व प्रियांका सावंत यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'संप्रेक्षणाचा विकास ही काळाची गरज'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शैक्षणिक संकुलांच्या माध्यमातून संप्रेषणाचा विकास मोठ्या प्रमाणात करणे ही काळाची गरज बनली आहे', असे प्रतिपादन प्रा. डॉ. नारायण चौधरी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे होते.

डॉ. नारायण चौधरी म्हणाले, 'संप्रेषणाचा वापर समाजातील सर्वच क्षेत्रात अपरिहार्य झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रात संप्रेषणाचा वापर जर मोठया प्रमाणात झाला तर शिक्षणाची गंगा खेडयापाडयापर्यंत पोहचवण्यास मदत होईल. संप्रेषण विकासामध्ये सामाजिक शास्त्रज्ञांची भूमिका ही सकारात्मक असेल तर समाजाला त्याचा फायदा होईल.'

अध्यक्षस्थानावरुन बोलताना डॉ. जगन कराडे म्हणाले, 'संशोधकांनी समाजाप्रती बांधील राहून संशोधन केले पाहिजे. अन्यथा संशोधनाला कोणताही अर्थ राहणार नाही. संप्रेषणामध्ये सहभागी निरीक्षणे महत्त्वाची असतात.' डॉ. श्रीमती प्रतिभा देसाई प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मांनले. यावेळी डॉ. श्रीमती प्रतिमा पवार यांच्यासह संशोधक विद्यार्थी, एमएचे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

20 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# जातिव्यवस्था नष्ट होणे गरजेचे

## टी. एस. पाटील : संविधानामुळे देश अखंड राहिला



**शाहू छत्रपती व्याख्यानमाला**

कोल्हापूर : जातिव्यवस्था नष्ट झाली, तर देश बलवान होईल. भारतातील सर्वजण एकच आहोत. आपण कोणत्याही जातीचे नाही, तर समान आहोत, हा विचार मांडला तर निश्चितपणे आपण बलवान होऊ, असे प्रतिपादन प्राचार्य टी. एस. पाटील यांनी केले.

येथील शहाजी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित राजर्षी शाहू छत्रपती व्याख्यानमालेत 'राजर्षी शाहू महाराज, श्रीमंत सयाजीराव गायकवाड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऋणानुबंध' यावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे होते.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, धर्माच्या नावावर देश बनलेल्या पाकिस्तानचे दोन देश झाले. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळे भारत देश अखंड राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्यासाठी प्रयत्न केले. त्याचवेळी त्यांनी लोकशाहीची बीजे पेरली. पुढे महात्मा फुले यांनी मनुस्मृतीतील ब्राह्मणवादाला आव्हान देऊन शिक्षण, समता व विज्ञानाचा विचार मांडला. तेच तत्त्वज्ञान राजर्षी शाहू महाराज, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपआपल्या संस्थानांत राबविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठी मदत केल्याने त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब संविधानात पडलेले दिसते. त्यामुळे भारत एकसंघ व अखंड राहिला आहे. देश खरोखरच बलवान, सामर्थ्यशाली बनविण्यासाठी येथील जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. डॉ. मोरे म्हणाले, सध्या गुणात्मक शिक्षणास महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी शाहू-फुले-आंबेडकर यांचे योगदान, परिश्रमाचा आदर्श ठेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे.

कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. एच. एस. वनमोरे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक मनिष भोसले आदी उपस्थित होते. प्रा. सुरेश शिखरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

## रविवारी रोजगार मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य विकास, रोजगार मार्गदर्शन केंद्र आणि गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. २२) कौशल्य व रोजगार मेळावा होणार आहे. गोखले कॉलेजमध्ये सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत मेळावा होणार आहे. यात जिल्ह्यातील खासगी आस्थापनांकडील विविध शैक्षणिक पात्रतेच्या ४२४ पदांवर नेमणूक करण्यात येणार आहे. क्रॉसलँड, प्रोटोकॉल लिड्स इन्फोटेक, शुभविवाह मेट्रॉमोनी, फॉक्स अँड क्लाउड, सोक्टास इंडिया प्रा. लि., साउंड कास्टींग प्रा. लि., मंत्री मॅटॅलिक्स प्रा. लि., राज हिरा टूल्स, अलर्ट सर्व्हिसेस, स्कायलार्क आदी कंपन्यांचा यात समावेश आहे अशी माहिती रोजगार केंद्राचे सहाय्यक संचालक एस. टी. जाधव यांनी दिली.